जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

# दैनंदिन गुन्हयाची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०३/०५/२०२१
## दि.०२/०५/२०२१ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे १०३/२०२१,भादविक ३०७,५०४,५०६(२),आर्म ॲक्ट कलम ४(२५),महा.पो.कायदा कलम ३७(१)(३) सह १३५, क्रि.लॉ. अमेडमेंट ॲक्ट कलम ७ |
| **फिर्यादी** | ओम सुरवसे,वय-२१ वर्षे,रा.स.नं.१३३,दांडेकर पुल,सिंहगड रोड,पुणे |
| **आरोपी** | चार इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/०५/२०२१ रोजी सकाळी ०९/३० वा.फिर्यादी यांचे राहते घरा जवळील सार्वजनीक शौचालया समोर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे राहते घराजवळील सार्वजनिक शौचालय येथे प्रात विधीसाठी गेले असताना,दोन दिवसांपुर्वी फिर्यादी यांचे दोन कामगारांनी यातील नमुद आरोपी यांची सिगारेट आणुन न दिल्याचे कारणावरून,त्यांनी कामगारांना विनाकारण शिवीगाळ करून मारहाण केली होती. त्याचा जाब विचारल्याचा राग मनात धरून,"याला तर आज जिवंत सोडायचा नाही मारा रे याला" असे म्हणून फिर्यादीस शिवीगाळ करून त्यांना जीवे ठार मारण्याचे उद्देशाने,सदर आरोपी यांनी लोखंडी कोयत्याने फिर्यादी यांचे डोक्यावर व डावे हाताचे बोटावर वार करून त्यांना गंभीर जखमी केले. त्यावेळी फिर्यादी यांनी आरडा-ओरडा केला असता,तेथील जमा झालेल्या लोकांना आरोपी यांनी त्यांचेकडील लोखंडी कोयते लोकांच्या दिशेने फिरवुन शिवीगाळ करून,"सुटा येथुन पळा,आमच्या नादी लागला तर एकाला पण सोडनार नाही" असे म्हणून सदर भागात दहशत निर्माण केल्याने जमलेले सर्व लोक घाबरून सैरावैरा पळु लागले व काही लोकांनी आपल्या घराच्या दारे खिडक्या लावुन घेतल्या व ते सर्वजण तेथुन निघुन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. व्ही.एच.पवार ९५४५२००१०० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे १२२/२०२१,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | जयवंत होनकळसे,वय-३९ वर्षे,रा.पवार वस्ती,लोहगाव,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०४/२०२१ रोजी सकाळी ०७/०० वा.ते दि.३०/०४/२०२१ रोजी सकाळी १०/१९ वा.चे दरम्यान अमायरा व्हिला नं.३,लेन नं.३,पवार वस्ती,लोहगाव,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून, बेडरूम मधील लाकडी कपाटातील ड्रावर उचकटुन,त्यामधून १२,०००/- रुपये रोख व सोन्याचे दागिने असा एकुण १,२१,८००/- रुपये किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. आर.ए.पाटील ८०५५९९०३४३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे १२४/२०२१,भादविक ४२०,४६५,४६८,४७१,४०९,३४ |
| **फिर्यादी** | चंद्रशेखर राजगोपालन,वय-५३,रा.विमाननगर,पुणे |
| **आरोपी** | एक इसम व एक महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे सप्टेबर २०२० ते दि.०७/०४/२०२१ रोजीचे कालावधीत फिर्यादीचे राहते घरी ऑनलाईन ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद आरोपी यांनी फिर्यादी यांचे वडील हयात असताना,त्यांचे खासगी बॅंकेतील अकाऊंट नंबरवर लिंक असलेला मोबाईल नंबर परस्पर बदलुन,तसेच त्यांनी गुंतवणुक केलेल्या पॉलीसी व म्युचल फंड याबाबत खोटी माहिती देवुन,त्याबाबतचे पैसे बॅंक अकाऊंटवर जमा झाले आहेत हे भासवण्यासाठी बनावट बॅंकेचे अकाऊंट स्टेटमेंट तयार करून त्यांना दाखविले आहे. तसेच वडीलांचे निधन झालेनंतर सदर आरोपी यांनी फिर्यादी यांचे बॅंक अकाऊंवरून पैसे ट्रन्सफर करून घेवुन,फिर्यादी यांचे वडीलांचा वृध्दपणाचा फायदा घेवुन,त्यांना बनावट कागदपत्रे सादर करून त्यांच्या अकाऊंटवरील व पॉलीस / मॅच्युअल फंडातील गुंतवणुक केलेली सदरची रक्कम बनावट सही करून काढण्याचा प्रयत्न करून फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.एस.जाधव ९४२१८७६७०३ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**

.